लोकमत

# 'जेडीआयईटी'च्या पोस्टर स्पर्धेत मोहिनी पवार पहिली


मोहिनी पवार


मारिया सैयद


सुरज अब्दलवार


शिवानी पातालबन्सी


संपदा भोंडे

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** येथील जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे ऑनलाईन पोस्टर सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या या स्पर्धेत पांढरकवडा येथील मोहिनी कैलास पवार ही प्रथम रोख बक्षिसाची मानकरी ठरली. ती येथील अँग्लो हिंदी हायस्कूलची विद्यार्थिनी आहे.

अ सॅल्यूट टू कोविड-१९ वॉरिअर्स : वी विल विन (कोविड-१९ योद्धयांना सलाम : आपण नक्की जिंकू) असा या स्पर्धेचा विषय होता. यामध्ये जवळपास १५८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने सहभाग नोंदविला होता. द्वितीय पारितोषिक यवतमाळ येथील फ्री मेथॉडिस्ट इंग्लिश हायस्कूलची मारिया सैयद, तृतीय बक्षीस नांदेड येथील गोदावरी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचा सुरज भारत अब्दलवार याने पटकाविले. यवतमाळ येथील स्कूल ऑफ स्कॉलर्सची शिवानी सुनील पातालबन्सी, मुंगसाजी ज्युनिअर कॉलेजची संपदा किरण भोंडे ही प्रोत्साहनपर पारितोषिकाची मानकरी ठरली. कोरोना विषाणूने सर्वांना त्रस्त करून सोडले आहे. अशा या आपत्तीच्यावेळी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत डॉक्टर्स, नर्सेस, मेडिकलचा संपूर्ण चमू, पोलीस विभाग, विविध शासकीय विभागांतील कर्मचारी, अशासकीय सेवा संस्था, स्वयंस्फूर्तीने झोकून दिलेले स्वयंसेवक यांनी कोविड योद्धयांची भूमिका पार पाडली. या योद्धयांना सलाम करण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. यात विद्यार्थी कलावंतांनी रेखाचित्रे ऑनलाईन सादर करून सहभाग नोंदविला. सर्व सहभागी स्पर्धकांना ई-प्रमाणपत्र व रोख पारितोषिक दिले जाणार आहे.